६२
७२३

# महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ (अ) अन्वये आदेश

जा.क्र.उपनि/वसई/बी.१/पायलट इंड.प्रिमा./क.७७(अ)/ ५२६ /२०१७
उपनिबंधक सहकारी संस्था वसई तालुका यांचे कार्यालय
तामतलाव, जॉनी क्रॉस गल्ली, ता. वसई, जि. ठाणे
दिनांक :-३०/०५/२०१७

वाचले :- १) श्री.विजय चाफेकर यांचे तक्रार अर्ज.
२) या कार्यालयाचे दिनांक ०४/०६/२०१५ रोजीचे कलम कलम ७९(२) चे निदेश.
३) या कार्यालयाकडील दिनांक २०/३/२०१६ रोजीचे कलम ७९(३) चे निदेश
४) या कार्यालयाचे जा.क्र.४४१५/२०१७ रोजी कलम ७८अ(१((ब) अन्वये पारित केलेले आदेश.
५) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ (अ) मधील तरतुद.

उप-निबंधक सहकारी संस्था, वसई
वसई तालुका वसई

ज्याअर्थी, पायलट इंडस्ट्रियल इस्टेट प्रिमायसेस को.ऑप.सोसा.लि.नवघर,वसई रोड (पू) ता.वसई जि.पालघर ही संस्था महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१ नुसार नोंदणीकृत सर्वसाधारण संस्था असून ती या कार्यालयाच्या अधिकार कक्षेत येते,आणि,

ज्या अर्थी वायले क्रमांक १ अन्वये संस्थेचे सभासद श्री.विजय चाफेकर यांनी या कार्यालयाकडे संस्थेच्या पदाधिका-यांच्या अनियमिततेबाबत अनेक तक्रारी दाखल केल्या आहेत.त्यास अनुसरुन संस्थेस योग्य ती कार्यवाही करण्याच्या सुचना वेळोवेळी देण्यांत आलेल्या आहेत.या कार्यालयाकडील निर्गमित केलेल्या सुचनांचे पालन करण्यात संस्था पदाधिकारी हेतूपुरस्पर टाळाटाळ करीत असल्याचे निदर्शनास आल्याने संस्था पदाधिका-यांना त्यांच्या पदावरुन दुर का करण्यांत येवू नये याबाबत कार्यालयाकडील संदर्भ क्रमांक ४ अन्वये त्यांचे म्हणने सादर करणंबाबत कळविण्यांत होते. .आणि,

ज्या अर्थी या कार्यालयाकडील संदर्भ क्रमांक ४ च्या कारणेदाखवा नोटीसीच्या अनुषंगाने या कार्यालयात दिनांक ०८/११/२०१६ रोजी सुनावणी घेण्यांत आली. सुनावणी दरम्यान संस्थेने सादर केलेले लेखी म्हणने तसेच प्राप्त दस्तऐवजाचे अनुषंगाने संस्थेच्या पदाधिकारी या कार्यालयाकडील निदेशांचे पालन करण्यात हेतुपुरस्पर टाळाटाळ केल्याचे दिसून येत असल्याने या कार्यालयाकडील संदर्भ क्रमांक ५ चे आदेशाने संस्थेचे पदाधिकारी (अध्यक्ष,सचिव,खजिनदार) यांना त्यांच्या पदावरुन काढून टाकण्यांत येवून पुढील एका कालावधीची मुदत संपेपर्यंत संस्थेच्या व्यवस्थापन समितीवर निवडून येण्यास निर्बंध घालण्यांत आलेले आहेत. आणि,

ज्याअर्थी संस्थेच्या समितीवर एकूण ७ सदस्य कार्यरत होते पैकी दान संचालकांनी त्यांच्या पदांचा राजीनामा दिल्याने तसेच या कार्यालयाकडील संदर्भ क्रमांक ५ अन्वये संस्थेच्या पदाधिकारी यांना निष्क्रीय ठरविल्यामुळे संस्थेच्या समितीवर फक्त २ संचालक कार्यरत आहेत.त्यामुळे संस्थेची समिती अप्लमतात आलेली आहे.आणि,

Received
S.M. Vartak
Date:- 31/05/2017

Scanned by CamScanner

त्याअर्थी पायलट इंडस्ट्रियल इस्टेट प्रिमायसेस को.ऑप.सोसा.लि.नवघर,वसई रोड (पू) ता.वसई जि.पालघर संस्थेवर सद्यस्थितीत संचालक मंडळ कार्यरत नसल्याबाबत माझी खात्री झाली आहे. सबब संस्थेचे दैनंदिन कामकाज पाहण्याकरिता प्राधिकृत अधिका-याची नेमणूक करणे आवश्यक असल्याने खालिलप्रमाणे आदेश पारित करण्यांत येत आहे.

## :- आदेश -:

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ (अ) अन्वये प्राप्त अधिकारानूसार मी, प्रियंका गाडीलकर, उप निबंधक, सहकारी संस्था,वसई पायलट इंडस्ट्रियल इस्टेट प्रिमायसेस को.ऑप.सोसा.लि.नवघर,वसई रोड (पू) ता.वसई जि.पालघरया संस्थेची व्यवस्थापक बरखास्त करून त्याठिकाणी **श्री.सुमन शांताराम भंडारी व श्री.नागेश राव** यांची प्राधिकृत अधिकारी मंडळ म्हणून नियुक्ती करीत आहे.

प्राधिकृत अधिकारी यांनी संस्थेच्या दप्तराचा व मालमत्तेचा व दावायोग्य कागदपत्रांचा संपूर्ण पदभार घेवून तसा अहवाल या कार्यालयास सादर करावा.तसेच संस्था संचालक मंडळाचे निवडणूकीचे अनुषंगाने सभासदांची यादी विहित नमुन्यात तयार करुन या कार्यालयास सादर करावी.

प्रस्तुत आदेश आज दि. ३०/०५/२०१७ रोजी माझे सही व शासन मुद्रेसह दिला असे.

उप-निबंधक सहकारी संस्था, वसई
वसई तालुका वसई

( प्रियंका गाडीलकर )
उपनिबंधक,
सहकारी संस्था, वसई.

प्रत,

१. श्री. श्री.सुमन शांताराम भंडारी व श्री.नागेश राव प्राधिकृत अधिकारी मंडळ, पायलट इंडस्ट्रियल इस्टेट प्रिमायसेस को.ऑप.सोसा.लि.नवघर,वसई रोड (पू) ता.वसई जि.पालघर

२. अध्यक्ष/सचिव, पायलट इंडस्ट्रियल इस्टेट प्रिमायसेस को.ऑप.सोसा.लि.नवघर,वसई रोड (पू) ता.वसई जि.पालघर

२/- त्यांना कळविण्यात येते की, त्यांनी संस्थेच्या दप्तराचा ,मालमत्तेचा व दावायोग्य कागदपत्रांचा संपूर्ण ताबा प्राधिकृत अधिकारी यांना देवून तसा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

३. शाखा व्यवस्थापक,बँक ऑफ बडोदा शाखा वसई (पू)

Scanned by CamScanner